**छोटी जाहीरातसाठी संपर्क**

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

आपल्या दैनिकात छोटी जाहीरात प्रकाशित करण्यासाठी hinduprakashvarta@gmail.com या मेल वर आपली जाहीरात पाठवावे, तसेच खालील नंबरवर संपर्क साधावा.

जाहीरात व्यवस्थापक

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता, संभाजीनगर

Mob. No.: 7261999911



# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



**वेअर हाऊस, गोडाऊन भाड्याने देणे/घेणे साठी**

Chaitali enterprises.leading warehouse leasing company Chhatrapati Sambhaji nagar

संपर्क

www.chaitali enterprises.com वर किंवा मोबाईल नंबर 9226611011 वर साधावा.



छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. ०३ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ४४ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## थोडक्यात वार्ता

### औरंगाबाद-जालना स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात सहा उमेदवार मैदानात

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या औरंगाबाद-जालना स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज छाननी नंतर सहा उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. यामध्ये भारतीय जनता पक्ष व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या प्रमुख पक्षांच्या प्रत्येकी एका उमेदवारासह चार अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे. वैध उमेदवारांच्या यादीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या ॲड. देवयानी कृष्णा पाटील डोणगावकर तर भाजपकडून सुहास त्र्यंबकराव शिरसाठ यांचा समावेश आहे. त्यामुळे या मतदारसंघातील प्रमुख लढत महायुती आणि महाविकास आघाडी समर्थित उमेदवारांमध्ये होण्याची चिन्हे आहेत. याशिवाय अब्दुल समीर अब्दुल सत्तार, इसाक खान संदू खान, ॲड. फारूक सादिक तुंडीवाले आणि गणेश कोतिकराव लोखंडे हे चार अपक्ष उमेदवारही निवडणूक रिंगणात उतरले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींच्या मतांवर आधारित असलेल्या या निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर अंतिम चित्र स्पष्ट होणार असले, तरी सध्या सहा उमेदवारांमुळे निवडणुकीत चांगलीच रंगत निर्माण झाली आहे.

### 'आम्ही पोलिस आहोत' म्हणत वृद्धाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या लंपास

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील मुकुंदवाडी परिसरात पोलिस असल्याची बतावणी करून एका सेवानिवृत्त वृद्ध दांपत्याची फसवणूक करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. भररस्त्यात दोन अज्ञात बुलेटस्वारांनी ७४ वर्षीय वृद्ध आणि त्यांच्या पत्नीला अडवत, पुढे वरिष्ठ अधिकाऱ्यांची तपासणी सुरू असल्याचे सांगून विश्वास संपादन केला. यानंतर संशयितांनी वृद्धाच्या हातातील सुमारे ८ ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या काढून घेतल्या. अंगठ्यांच्या बदल्यात त्यांनी दगडाचे खडे असलेली पुडी देत घटनास्थळावरून पलायन केले. फसवणुकीचा प्रकार लक्षात येताच दांपत्याने पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणी मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेतला जात आहे. नागरिकांनी अशा प्रकारच्या बनावट पोलिसांपासून सावध राहावे, असे आवाहनही पोलिसांनी केले आहे.

### बंगालच्या उपसागरात भूकंप; पाण्याखाली 4.6 तीव्रतेचे धक्के जाणवले

**कोलकाता :** आज सकाळी बंगालच्या उपसागरात ४.६ तीव्रतेचा भूकंप झाला. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या माहितीनुसार, सकाळी ७.४३ वाजता १० किलोमीटर खोलीवर भूकंपाची नोंद झाली. मंगळवारी सकाळी बंगालच्या उपसागरात भूकंपाचे धक्के जाणवले. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या माहितीनुसार, या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.६ होती. हा भूकंप २ जून रोजी सकाळी ७.४३.१७ वाजता झाला. याचे केंद्र बंगालच्या उपसागरात १४.०२७ अंश उत्तर अक्षांश आणि ९३.१३२ अंश पूर्व रेखांश येथे होते. भूकंपाची खोली १० किलोमीटर नोंदवली गेली, ज्यामुळे हा भूकंप उथळ श्रेणीतील ठरला.

# दोन लाखांपर्यंतचे कर्जमाफ; 'वन टाईम सेटलमेंट' आणि प्रोत्साहनपर अनुदान देणार

**मुंबई :** राज्यातील शेतकरी बांधवांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळवून देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेला मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या योजनेत जमीन धारणेचा निकष नसेल. दोन लाख रुपयांपर्यंत ही कर्जमाफी असेल. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल मंत्रिमंडळ बैठकीत सर्व मंत्र्यांनी टाळ्यांच्या गजरात मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले व या निर्णयाचे स्वागत केले.

या योजनेत कर्जमुक्ती, 'वन टाईम सेटलमेंट' व प्रोत्साहनपर लाभ असे तीन घटक केल्याने, राज्यातील बहुतांश शेतकरी बांधवांना याचा लाभ होणार आहे. ज्यांचे कर्ज दोन लाखांपेक्षा कमी आहे, त्यांना दोन लाख रुपयांपर्यंत माफी मिळाल्याने असे शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त होणार आहेत. ज्यांचे कर्ज दोन लाखांपेक्षा अधिक आहे, त्या शेतकऱ्यांना दोन लाखांवरील थकबाकी ३१ मार्च २०२७ पूर्वी भरल्यास मुदत देण्यात येईल. त्यांच्या खात्यातही दोन लाख रुपये शासन जमा करणार आहे. तर याशिवाय प्रोत्साहनपर लाभ योजनेत कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना अधिकाधिक पन्नास हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान मिळणार आहे. या योजनेत राजकीय पदाधिकारी, सरकारी कर्मचारी व आयकर पात्र व्यक्ती, सहकारी संस्थांचे २५ हजार रुपयांहून अधिक वेतन असणारे अधिकारी, कर्मचारी पात्र नसतील.

कर्जमुक्ती योजना

शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली व ३१ मार्च २०२६ अखेर परतफेड न झालेली एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्जखात्यावरील एकत्रित थकबाकीची मुद्दल व व्याजासह अधिकतम दोन लाखापर्यंत आहे, अशा शेतकऱ्यांना (जमीन धारणेचे क्षेत्र विचारात न घेता) दोन लाख रुपयांपर्यतची कर्जमाफी दिली जाईल.

एकवेळ समझोता योजना

या योजनेमध्ये १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्ज खात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली व ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल, अशा शेतकऱ्याने दोन लाखांपेक्षा जास्त असलेली थकीत रकमेची बँकेस/संस्थेस परतफेड करणे आवश्यक असेल. अशी रक्कम परतफेड केल्यानंतर पात्र शेतकऱ्याला 'वन टाईम सेटलमेंट' म्हणून दोन लाख रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ देण्यात येईल.या योजनेत देखील १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ अखेर उचल केलेल्या पीक कर्जाचे पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या कर्जखात्यांपैकी एक किंवा अनेक बँकांकडील ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या व ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या थकीत हप्त्यांची मुद्दल व व्याजासह दोन लाखांपेक्षा जास्त असल्यास अशा शेतकऱ्याने प्रथम दोन लाखांपेक्षा जास्त असलेली थकीत हप्त्यांच्या रकमेची परतफेड करणे आवश्यक असेल. अशी रक्कम परतफेड केल्यानंतरच पात्र शेतकऱ्याला एकवेळ समझोता योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांची कर्जमाफी मिळेल. तसेच, या योजनेमध्ये शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची दोन लाखांवरील रक्कम बँकेमध्ये जमा करण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

प्रोत्साहनपर लाभ योजना

ज्या शेतकऱ्यांची मुद्दल व व्याजासह थकबाकीची रक्कम ५० हजार रुपयांपेक्षा जास्त आहे, अशा शेतकऱ्यांनी पन्नास हजार रुपयांवरील संपूर्ण थकबाकी बँकेत जमा केल्यानंतर त्यांना प्रतिशेतकरी पन्नास हजार रुपये देण्यात येणार आहेत, जेणेकरून ते कर्जमुक्त होतील. या योजनेमध्ये शेतकऱ्यांना त्यांच्या हिश्श्याची ५० हजारांवरील रक्कम बँकेमध्ये जमा करण्यासाठी देखील ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती (२०१९) योजनेमध्ये ज्या शेतकऱ्यांना लाभ मिळाला आहे. अशा शेतकऱ्यांनी नव्याने घेतलेल्या कर्जाची थकबाकी झाली असल्यास अशा शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या व ३१ मार्च २०२६ अखेर परतफेड न झालेली मुद्दल व व्याजासह रक्कम ५० हजार रुपये असल्यास अशा शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ

## बसचे हेडलाईट बंद पडल्याने प्रवाशाचा गोंधळ
# वाहकाची 60 हजारांची तिकीट मशीन हिसकावून प्रवासी पळाला!

**छत्रपती संभाजीनगर :** एसटी बसचे हेडलाईट बंद पडल्यामुळे प्रवाशांची दुसऱ्या बसमध्ये सोय करत असताना, एका संतापलेल्या प्रवाशाने जोरदार गोंधळ घालत थेट वाहकाच्या (कंडक्टर) हातातील ६० हजार रुपये किमतीची इलेक्ट्रॉनिक तिकिट मशीन बळजबरीने हिसकावून पळ काढल्याची धक्कादायक घटना हर्सूल भागात घडली आहे. या मशीनमध्ये प्रवाशांच्या तिकिटांचे सुमारे १५ ते १६ हजार रुपये जमा होते. या प्रकरणी एसटी वाहक मंगेश उत्तमराव दळवी (वय ३७, रा. महाड, जि. रायगड) यांनी हर्सूल पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी अज्ञात प्रवाशाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महाड-जळगाव ही एसटी बस छत्रपती संभाजीनगर शहरातून जळगावकडे जात होती. सायंकाळी साडेसातच्या सुमारास बस हर्सूल टी-पॉइंटजवळ आली असता, अचानक बसचे हेडलाईट बंद पडले. रात्रीच्या वेळी पुढील प्रवास करणे धोक्याचे असल्याने चालकाने प्रसंगावधान राखून बस रस्त्याच्या बाजूला घेत हर्सूल गावातील हनुमान मंदिराजवळ उभी केली. वाहकाने सर्व प्रवाशांना खाली उतरवून, त्यांना जळगावकडे जाणाऱ्या दुसऱ्या बसमध्ये बसवून देण्याची व्यवस्था सुरू केली. मात्र, याच वेळी बसमधील एका प्रवाशाने अचानक गोंधळ घालण्यास सुरुवात केली. वाहक मंगेश दळवी यांनी तातडीने हर्सूल पोलीस ठाणे गाठून घडलेला प्रकार सांगितला. पोलिसांनी शासकीय कामात अडथळा आणणे आणि चोरी केल्याप्रकरणी त्या अनोळखी प्रवाशाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार राकेश देशमुख करत असून, पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

# पश्चिम बंगालमध्ये महाराष्ट्राची पुनरावृत्ती
## ममता बॅनर्जींचा पक्ष चिन्ह अन् नावासहीत फोडणार

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये अलिकडेच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत तब्बल 15 वर्षे सत्तेत राहिलेल्या टीएमसीचा पराभव झाला आहे. त्यानंतर आता पक्षाच्या अस्तित्वावरच संकटाचे ढग दाटू लागल्याची चर्चा सुरू झाली आहे. TMC चे 80 पैकी तब्बल 50 आमदार बाहेर पडून स्वतंत्र गट स्थापन करू शकतात अशी माहिती समोर आला आहे. इतकेच नव्हे तर हा बंडखोर गट TMC च्या निवडणूक चिन्हावरही दावा करू शकतो, अशीही चर्चा रंगली आहे. याचे कारण म्हणजे विरोधी पक्षनेते पदाच्या नियुक्तीवेळी बनावट स्वाक्षरी प्रकरणावरून पक्षाने ऋतब्रता बॅनर्जी आणि संदिपन साहा या दोन आमदारांची पक्षातून हकालपट्टी केली होती. त्यानंतर ही चर्चा रंगली आहे.

**टीएमसीच्या आमदारांमध्ये फूट :**



दोन आमदारांच्या निलंबनानंतर ऋतब्रत बनर्जी यांच्या नेतृत्वाखालील आमदारांचा मोठा गट ममता बॅनर्जी यांच्या बैठकींपासून दूर राहू लागला आहे. मंगळवारी (2 जून) कोलकात्यात ममता बॅनर्जी यांनी आयोजित केलेल्या आंदोलनातही बहुतांश आमदार अनुपस्थित होते. तिथे फक्त सहा आमदार आणि तीन खासदार उपस्थित होते. दुसरीकडे बंडखोर गट गुप्त बैठका घेत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे पक्षातील मधील बंडखोरीच्या चर्चांना अधिकच हवा मिळाली आहे.

बंगालमधील या राजकीय परिस्थितीची तुलना शिवसेनेतील फुटीशी केली जात आहे. त्यावेळी एकनाथ शिंदे यांनी बंड करत शिवसेना फोडली होती आणि पक्षाच्या चिन्हावरही दावा केला होता. आता तृणमूलचे चे निलंबित राष्ट्रीय प्रवक्ते रिजू दत्ता यांनी इंडिया टुडेला सांगितले की, बंडखोर गट TMC पक्षावर आणि निवडणूक चिन्हावर दावा करण्याचा प्रयत्न करू शकतो.

**विरोधी पक्षनेते पदावरून वादाची सुरुवात :**

हा वाद विरोधी पक्षनेते पदाच्या नियुक्तीपासून सुरू झाला. TMC मधील अनेक नव्याने निवडून आलेल्या आमदारांची इच्छा होती की पश्चिम बंगाल विधानसभेत विरोधी पक्षनेतेपदी ऋतब्रत बनर्जी यांची नियुक्ती व्हावी. मात्र, ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील पक्षश्रेष्ठींनी शोभनदेव चट्टोपाध्याय यांच्यावर ही जबाबदारी सोपवली. त्यानंतर अभिषेक बॅनर्जी यांनी विधानसभा अध्यक्षांना दिलेल्या पत्रावर ऋतब्रत बनर्जी आणि संदीपन साहा यांच्या स्वाक्षऱ्या नव्हत्या.

## 80 वर्षीय वयोवृद्ध आजीसोबत तरुणानं नको नको ते केलं

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठणच्या पाचोड येथील अतिशय संतापजनक आणि माणूसकीला काळिमा फासणारी घटना समोर आली आहे. यात एका 80 वर्षीय वृद्ध आजीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना उजेडात आली आहे. पैठणच्या पाचोड येथील कल्याणनगर परिसरात हि माणूसकीला काळिमा फासणारी घटना घडली आहे. परिणामी परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. याप्रकरणी रोहन साहेबराव आहीरे (कल्याणनगर, पाचोड) याच्याविरुद्ध पाचोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पाचोड पोलिसांनी त्याला तातडीने ताब्यात घेतले आहे. मात्र या अतिशय विकृत कृत्यामुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 1 जुन रोजी 3 वाजेच्या सुमारास सुसाट वारा सुटल्याने रोहन आहेर याने मदतीचे नाटक करत वृद्ध महिलेला घरात नेले आणि तिच्याशी जबरदस्ती करत लैंगिक अत्याचार केला. वृद्ध महिलेच्या आरडाओरडीनंतर परिसरातील नागरिक आणि महिलांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तिला रोहनच्या तावडीतून सोडवले. नातेवाईकांच्या मदतीने पीडित महिलेला पाचोड पोलीस ठाण्यात आणण्यात आलं. त्यानंतर घडलेला सर्व प्रकार पोलिसांना सांगण्यात आला असता पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पुढील तपास उपनिरीक्षक राम बारहाते करीत आहेत.







**छत्रपती संभाजीनगर : शहाबाजार येथे जलवाहिनीचे लिकेज शोधण्यासाठी ठेकेदाराने लावलेल्या मजुरांना लिकेज सापडले नाही,या कामासाठी चार ठिकाणी खड्डे करून ठेवल्याने रस्ता तर अडवला गेला,पण मजबूत सिमेंट रोड फोडल्याने त्याचीही वाट लागली.**

## कॉकरोच जनता पार्टीचं 6 जून रोजी आंदोलन

**मुंबई :** सोशल मीडियावर कॉकरोच जनता पार्टीला मोठा पाठिंबा मिळताना दिसत आहे. युवकांच्या नव्या पक्षाचे सोशल मीडियावर मोजक्या काही दिवसांत प्रस्थापित पक्षांहून अधिक फॉलोवर्स झालेत. २० लाखांहून अधिक फॉलोवर्स असलेल्या कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी अमेरिकेतून मोठी घोषणा केली आहे. अभिजीत दीपके यांच्या घोषणेने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

कॉकरोच जनता पार्टीचे अभिजीत दीपके यांनी भारतात येणार असल्याचे जाहीर केले. त्यानंतर दिल्लीत मोदी सरकारविरोधात आंदोलन करणार असल्याचेही जाहीर केले. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन करणार असल्याचे स्पष्ट केले.

## सुरतमध्ये दोन 'एसटी' बसचा अपघात; आठ प्रवाशांचा होरपळून मृत्यू

**सुरत :** गुजरातच्या सुरत जिल्ह्यातील बारडोली जवळून जाणाऱ्या धुळे हायवेवर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या दोन एसटी बसचा अत्यंत थरकाप उडवणारा भीषण अपघात झाला आहे. दोन बसमध्ये झालेली समोरासमोर धडक इतकी भयानक होती की, धडकेनंतर एक एसटी बस थेट महामार्गावर उलटली आणि क्षणार्धात तिने पेट घेतला. या आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने आठ प्रवाशांचा जागीच होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला तर १५ जण जखमी झाले. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.हा अपघात बारडोली तालुक्यातील उवा आणि मानेकपोर गावाच्या दरम्यान मंगळवारी सायंकाळी ५ ते सव्वा पाच वाजेच्या सुमारास घडला. अपघातात बळी पडलेल्या महाराष्ट्र परिवहन मंडळाच्या दोन्ही एसटी बसचे क्रमांक एमएच १८ बीझेड १२५८ आणि एमएच २० बीएल ३३९० असे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, यातील एक बस (धुळे-सुरत) धुळ्याहून नंदूरबार-नवापूर मार्गे सुरतच्या दिशेने येत होती, तर दुसरी बस गुजरातहून महाराष्ट्राच्या दिशेने जात होती. चालकाचे नियंत्रण सुटल्याने एक बस आधी हायवेवरील डिव्हायडरला जाऊन धडकली. याच वेळी समोरून येणारी दुसरी बस तिला वाचवण्याच्या प्रयत्नात बाजूला जात असताना थेट महामार्गावर उलटली. बस उलटताच एका मोठ्या स्फोटाने आगीचा गोळा बनली.

आग इतकी वेगाने पसरली की आतील प्रवाशांना बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही. या अपघातात दुसऱ्या बसच्या पुढच्या भागाचाही पूर्णपणे चेंदामेंदा झाला आहे.

# जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीला कंत्राटदारांचे ग्रहण!
## दोन महिन्यांपूर्वी दिले होते निर्देश; सभापती सचिन गरड यांच्या पाहणीत पुन्हा उघड झाल्या त्रुटी

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषदेची कोट्यवधी रुपयांची नवीन प्रशासकीय इमारत पूर्णत्वास नेण्यात कंत्राटदाराकडून होत असलेल्या दिरंगाईमुळे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पुन्हा चर्चेत आला आहे. विशेष म्हणजे, करारानुसार अवघ्या ३२ महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित असलेले हे काम अद्यापही अपूर्ण असून, दुसरीकडे कामाचे तब्बल ९० टक्के बिल कंत्राटदाराने उचलल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे कामाच्या गुणवत्तेसह आर्थिक जबाबदारीबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.





जिल्हा परिषद बांधकाम सभापती सचिन गरड यांनी नुकतीच कार्यकारी अभियंते आणि संबंधित अधिकाऱ्यांसह नवीन प्रशासकीय इमारतीची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीत अनेक महत्त्वाची कामे अद्याप पूर्ण न झाल्याचे स्पष्ट झाले. फर्निचर बसविणे, विद्युत यंत्रणा, अंतर्गत सजावट, तांत्रिक सुविधा तसेच काही पूरक नागरी कामे रखडलेली असल्याचे निदर्शनास आले.

विशेष म्हणजे, याच त्रुटी दोन महिन्यांपूर्वी झालेल्या पाहणीतही समोर आल्या होत्या. त्यावेळी संबंधित अधिकारी व कंत्राटदाराला उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते. मात्र दोन महिने उलटूनही परिस्थितीत कोणताही लक्षणीय बदल झालेला नसल्याने सभापतींनी नाराजी व्यक्त केली.

नागरिकांना अधिक वेगवान व सुलभ सेवा देण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या या नवीन प्रशासकीय इमारतीत जिल्हा परिषदेचे विविध विभाग एकाच छताखाली कार्यरत होणार आहेत. त्यामुळे नागरिकांची धावपळ कमी होऊन प्रशासकीय कामकाज अधिक परिणामकारक होण्याची अपेक्षा आहे. मात्र कंत्राटदाराच्या संथ कारभारामुळे या संपूर्ण प्रक्रियेलाच विलंब होत असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, या प्रकल्पासाठी निर्धारित कालावधी ३२ महिन्यांचा असताना मुदत संपूनही काम पूर्ण झालेले नाही. धक्कादायक बाब म्हणजे, कामाचे सुमारे ९० टक्के बिल अदा झाल्याचे सांगितले जात असतानाही प्रत्यक्षात अनेक मूलभूत कामे अपूर्ण असल्याचे पाहणीतून स्पष्ट

-> पान 2 वर

### "हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही"

**"नवीन प्रशासकीय इमारत लवकरात लवकर कार्यान्वित व्हावी, यासाठी दोन महिन्यांपूर्वीच उर्वरित कामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र पुन्हा पाहणी केली असता अनेक कामे अद्याप अपूर्ण असल्याचे दिसून आले. ही बाब गंभीर असून संबंधित अधिकाऱ्यांनी आणि कंत्राटदाराने कामांना गती देणे आवश्यक आहे. नागरिकांच्या पैशातून उभारल्या जाणाऱ्या या महत्त्वाच्या प्रकल्पात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. उर्वरित कामे तातडीने पूर्ण करून इमारत वापरासाठी सज्ज करण्याच्या सूचना दिल्या आहेत."**

**— सचिन गरड, सभापती (बांधकाम), जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर**

- **३२ महिन्यांची मुदत संपली; तरी इमारत अपूर्ण!**
- **करारानुसार ३२ महिन्यांत काम पूर्ण करणे अपेक्षित.**
- **प्रत्यक्षात अनेक महत्त्वाची कामे अजूनही रखडलेली.**
- **कामाचे सुमारे ९० टक्के बिल कंत्राटदाराने घेतल्याची माहिती.**
- **दोन महिन्यांपूर्वी दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी नाही.**
- **फर्निचर, विद्युत यंत्रणा आणि अंतर्गत सजावटीची कामे अपूर्ण.**
- **नागरिकांना सेवा देणारा महत्त्वाचा प्रकल्प रखडल्याने नाराजी.**

## संपादकीय

# कौटुंबिक व्यवस्थेचा बळी आणि आधुनिक नात्यांमधील अंतर्विरोध

कला आणि ग्लॅमर जगताला बाहेरून कवेत घेणारी चमक अनेकदा आतून किती अंधकारमय असते, याचा प्रत्यय भोपाळमध्ये अलीकडेच घडलेल्या शो-बिझ क्षेत्राशी संबंधित हत्या आणि आत्महत्येच्या धक्कादायक घटनेने पुन्हा एकदा आणून दिला आहे. या संवेदनशील आणि मन सुन्न करणाऱ्या घटनेने केवळ एका उगवत्या कलाकाराचा आयुष्यप्रवास संपवला नाही, तर भारतीय मध्यमवर्गीय मानसिकतेच्या अत्यंत खोलवर रुजलेल्या काही गंभीर व्याधींवरूनही बुरखा फाडला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर, आजच्या बदलत्या काळातील भारतीय विवाह संस्था, त्याभोवती फिरणारी लैंगिकता , विषारी नातेसंबंधांना केवळ विवाह नावाचा साचा टिकवण्यासाठी मृत्यूच्या दारापर्यंत ओढत नेण्याची मध्यमवर्गीय धडपड आणि विवाहामध्ये कुटुंबातील सदस्यांचा वाढता हस्तक्षेप या विषयांवर राष्ट्रीय पातळीवर एक मोठे वैचारिक वादळ निर्माण झाले आहे. भारतीय समाजमन, विशेषत: मध्यमवर्ग, आजही व्यक्तीपेक्षा 'संस्थेला' मोठे मानतो. 'लग्न एकदाच होते' आणि 'काहीही झाले तरी संसार टिकवला पाहिजे' ही मूल्ये आपल्याकडे इतकी टोकाची बिंबवली जातात की, अनेकदा ते नाते आत्मसन्मान आणि जीवापेक्षाही मोठे बनते. भोपाळच्या या घटनेत हे प्रकर्षाने समोर आले की, जेव्हा एखादे नाते 'टॉक्सिक' किंवा विषारी बनते, तेव्हा त्यातून सन्मानाने बाहेर पडण्याऐवजी, 'लोक काय म्हणतील?' या एकाच भीतीपोटी ते नाते टिकवण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये घटस्फोटाला किंवा नाते तुटण्याला आजही एक सामाजिक कलंक मानले जाते. याच मानसिकतेतून, नातेसंबंधांमधील छळ, मानसिक खच्चीकरण आणि हिंसाचार उघड्या डोळ्यांनी सोसला जातो. विवाहाचा हाच पोकळ साचा अखेर एखाद्याचा जीव घेण्यास किंवा आत्महत्येस प्रवृत्त करण्यास कारणीभूत ठरतो, हे या घटनेने अधोरेखित केले आहे. आधुनिक काळात, विशेषतत: शो-बिझ किंवा ग्लॅमर क्षेत्राशी जोडल्या गेलेल्या तरुण पिढीची लैंगिकता, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि निवडीचे स्वातंत्र्य यांबाबतचे दृष्टिकोन वेगाने बदलत आहेत. मात्र, आपली पारंपारिक विवाह संस्था अद्यापही या बदलांचा स्वीकार करण्यास पूर्णपणे तयार नाही. विवाहामधील लैंगिक सुसंगतता , जोडीदाराच्या स्वातंत्र्याचा आदर आणि वैयक्तिक अवकाश या विषयांवर आपल्या समाजात आजही उघडपणे चर्चा होत नाही. ज्यावेळी विवाहासारख्या पवित्र मानल्या गेलेल्या बंधनात लैंगिक शोषण, जबरदस्ती किंवा जोडीदाराच्या लैंगिक ओळखीवरून वाद निर्माण होतात, तेव्हा त्याकडे कौटुंबिक पातळीवर दुर्लक्ष केले जाते किंवा ते दाबण्याचा प्रयत्न होतो. भोपाळमधील शो-बिझ विश्वातील या दुर्घटनेने हे स्पष्ट केले आहे की, जोपर्यंत आपण विवाहातील लैंगिकता आणि मानसिक आरोग्य यांवर मोकळेपणाने बोलणार नाही, तोपर्यंत नात्यांमधील हिंसेचे मूळ आपण शोधू शकणार नाही. एखादे नाते जेव्हा तुमच्या अस्तित्वाला नख लावते, तेव्हा त्याला 'विषारी नाते' म्हटले जाते. शो-बिझमधील या घटनेत असे दिसून आले की, नैराश्य, संशय आणि एकमेकांवरील अविश्वास यांमुळे नाते पूर्णपणे सडले होते. तरीही, 'सगळं काही ठीक होईल' या भाबड्या आशेवर किंवा कुटुंबाच्या दबावामुळे ते नाते मृत्यूच्या दारापर्यंत ओढत नेले गेले. मध्यमवर्गामध्ये एका बाजूला आधुनिकतेचा आव आणला जातो, तर दुसऱ्या बाजूला नात्यांमधील हिंसेला 'पती-पत्नीमधील किरकोळ वाद' म्हणून सोडून दिले जाते. हीच मध्यमवर्गीय इच्छा, जी एका मृतप्राय झालेल्या नात्याला केवळ कायदेशीर कागदावर जिवंत ठेवू पाहते. अखेर एका प्रत्यक्ष मृत्यूला कारणीभूत ठरते. नातेसंबंधांमध्ये प्रेम आणि छळ या दोन्ही गोष्टी एकत्र राहू शकत नाहीत, हे समजून घेण्यात आपण कुठेतरी कमी पडत आहोत. भारतीय विवाहांचे एक वैशिष्ट्य म्हणजे येथे दोन व्यक्तींचे नव्हे, तर दोन कुटुंबांचे लग्न होते. हे जितके कौतुकास्पद आहे, तितकेच काही वेळा ते घातकही ठरते. भोपाळच्या या प्रकरणात कुटुंबातील सदस्यांची भूमिका आणि त्यांचा विवाहातील हस्तक्षेप हा चिंतेचा मोठा विषय ठरला आहे. अनेकदा कुटुंबातील सदस्य आपल्या मुला-मुलींना चुकीच्या नात्यातून बाहेर पडण्याचा सल्ला देण्याऐवजी 'सहन कर' किंवा 'सगळ्यांच्याच संसारात चढ-उतार असतात' असे सांगून परत पाठवतात. दोन्ही बाजूंच्या कुटुंबियांकडून एकमेकांवर केले जाणारे आरोप आणि नात्याला अहंकाराचा प्रश्न बनवणे, यामुळे पती-पत्नीमधील दरी सांधण्याऐवजी अधिक रुंदावत जाते. कुटुंबाची चिंता जर मुलांच्या आनंदापेक्षा त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेभोवती फिरत असेल, तर ती चिंता नसून तो एक मानसिक दबाव बनतो, जो तरुणांना टोकाचे पाऊल उचलण्यास भाग पाडतो. भोपाळमधील ही शो-बिझशी संबंधित हत्या आणि आत्महत्या केवळ एक गुन्हेगारी घटना नाही, तर तो आपल्या सामाजिक पराभव आहे. ग्लॅमर जगतातील चकाकीच्या मागे लपलेले हे क्रूर वास्तव आजच्या तरुण पिढीला आणि त्यांच्या पालकांना विचार करायला लावणारे आहे. विवाह संस्था टिकवणे महत्त्वाचे आहेच, परंतु व्यक्तीच्या जीवापेक्षा आणि मानसिक आरोग्यापेक्षा ती कधीही मोठी असू शकत नाही. जर एखादे नाते विषारी बनले असेल, तर त्यातून सन्मानाने आणि सुरक्षितपणे बाहेर पडणे हा गुन्हा नाही, तर तो जगण्याचा अधिकार आहे, ही जाणीव समाजात निर्माण व्हावी लागेल. कुटुंबांनीही आपल्या मुलांच्या सामाजिक प्रतिष्ठेपेक्षा त्यांच्या आत्मसन्मानाला आणि आनंदाला प्राधान्य देणे गरजेचे आहे. अन्यथा, विवाहाच्या नावाखाली अशा अनेक प्रतिभावान आयुष्यांचा बळी जात राहील आणि समाज केवळ मूकदर्शक बनून पाहत राहील. आतातरी या मानसिकतेत बदल करून ठोस पावले उचलण्याची वेळ आली आहे.

# नांदेड जिल्हा पोलीस दलातील 9 पोलीस निरीक्षकांसह 5 सहाय्यक निरीक्षकांच्या बदल्या

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**नांदेड :** नांदेड जिल्हा पोलीस दलात प्रशासकीय कारणास्तव पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी मोठे फेरबदल केले असून, जिल्ह्यातील अनेक महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी अनेक पोलीस ठाण्यांचे प्रभारी बदलण्यात आले असून, ९ पोलीस निरीक्षक आणि ५ सहाय्यक पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांची नवीन यादी जाहीर करण्यात आली आहे. वजीराबाद, हदगाव, सोनखेड, मुखेड आणि भोकर या पोलीस ठाण्यांमध्ये नवीन प्रमुखांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**पोलीस निरीक्षकांच्या बदल्या आणि नवीन ठिकाण:**

१. **परमेश्वर व्यंकटराव कदम:** वजीराबाद पोलीस ठाण्यावरून हदगाव पोलीस ठाणे येथे बदली.
२. **नागनाथ शंकर आयलाने:** लोहा पोलीस ठाण्यावरून जिल्हा विशेष शाखा येथे नियुक्ती.
३. **अजित पोपट कुंभार:** भोकर येथून वजीराबाद पोलीस ठाण्याचे प्रमुख म्हणून जबाबदारी.
४. **चितांबर शंकरराव कमठेवाड:** जिल्हा नियंत्रण कक्षातून मुखेड पोलीस ठाण्यात बदली.
५. **लक्ष्मण व्यंकटराव केंद्रे:** मुखेडवरून आता हिमायतनगर येथे ठाणे प्रमुख म्हणून नियुक्ती.
६. **निवृत्ती घोडके:**नियंत्रण कक्षातून कंधार पोलीस ठाण्याचे प्रमुखङ म्हणून नियुक्ती.
७. **चंद्रकांत विनायक जाधव:** कंधार येथून आता लोहा पोलीस ठाण्याची जबाबदारी.
८. **अमोल हरिदास भगत:** हिमायतनगर पोलीस ठाण्यातून नायगाव पोलीस ठाणे येथे बदली.
९. **मारुती श्रीराम मुंडे:** नियंत्रण कक्षातून आता शहर वाहतूक शाखा, वजीराबादचा प्रभार

**सहाय्यक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या आणि नवीन ठिकाण:**

१. **भागवत टीकाराम नागरगोजे:** वजीराबाद शहर वाहतूक शाखेतून सोनखेड पोलीस ठाण्याची जबाबदारी.
२. **संतोष बाळासाहेब जोधळे:** विमानतळ पोलीस ठाण्यातून सिंदखेड येथे नियुक्ती.
३. **महेश ज्ञानदेव मुळीक:** माळाकोळी येथून उस्माननगर पोलीस ठाण्याचे प्रमुख म्हणून बदली.
४. **रमेश बळीराम जाधवर:** इस्लापूर ठाण्याची जबाबदारी आता सिंदखेड ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.
५. **राजकुमार मोतीराम हिंगोले:** इतवारा शहर वाहतूक शाखेतून आता माळाकोळी ठाण्याचे प्रमुख म्हणून नियुक्ती.

# CBSE ऑन-स्क्रीन मार्किंग वाद: अध्यक्ष, सचिवांची तडकाफडकी बदली

**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या ऑन स्क्रीन मार्किंगच्या वादाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मंगळवारी (२ जून) सीबीएसईचे अध्यक्ष राहुल सिंग आणि मंडळाचे सचिव हिमांशू गुप्ता यांची तडकाफडकी बदली करण्यात आली. त्यानंतर काही तासांतच केंद्र सरकारने सीबीएसईच्या अध्यक्षपदी प्रशांत सीताराम लोखंडे यांची निवड करण्यात आली. तर, सीबीएसईचे पुढील सचिव म्हणून वरुण भारद्वाज यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली. तसेच या प्रकरणाच्या कथित अनियमिततेची चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारने एक सदस्यीय उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे.

सीबीएसई बोर्डाने इयत्ता बारावीच्या उत्तरपत्रिकांच्या तपासणीसाठी ऑन-स्क्रीन मार्किंग प्रणाली लागू केली. मात्र, निकाल लागल्यानंतर विद्यार्थी आणि पालकांकडून मोठ्या प्रमाणावर तक्रारी येऊ लागल्या. विद्यार्थ्यांनी आरोप केला की, त्यांना ऑनलाइन पोर्टलवर मिळालेल्या उत्तरपत्रिकांच्या स्कॅन कॉपीवरील हस्ताक्षर त्यांचे स्वतःचे नसून दुसऱ्याच कोणाचे तरी आहे.

# परभणीत शेवटच्या दिवशी सात उमेदवारांचे अर्ज दाखल

## महाविकास आघाडीकडून डॉ विवेक नांवदर महायुतीकडून सईद खान यांना उमेदवारी



हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी

परभणी हिंगोली विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात शेवटच्या दिवशी सोमवारी 1 जून महाविकास आघाडी व महायुतीच्या उमेदवारासह 7 जणांनीं उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले सोमवारी एक जून रोजी अंतिम मुदत वाढ होती त्यामुळे महायुती महाविकास आघाडीने यांनी आपापले उमेदवार जाहीर केले उभाटाचे डॉक्टर विवेक नावंदर यांनी उमेदवारी जाहीर झाली आहे त्यांनी उबाटा कॉंग्रेसच्या ज्येष्ठ मंडळी सोबत अर्ज दाखल केला यावेळी खासदार संजय जाधव आमदार डॉक्टर राहुल पाटील महापौर सय्यद इकबाल सिद्धार्थ हत्ती आंबिरे कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष बाबाजानी दुर्रानी महानगर जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांची उपस्थिती होती महायुतीकडून शिवसेना शिंदे गटाचे सईद खान यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. संजय शिरसाट पालकमंत्री माजी मंत्री सुरेश वरपूडकर नगराध्यक्ष आशेफ खान आधीची उपस्थिती होती राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मनपा सदस्य विजय जामकर यांनी देखील उमेदवारी अर्ज दाखल केला यावेळी मनपा सदस्य आकाश लहाने अक्षय देशमुख अर्जुन सामाले उपस्थित होते माजी आमदार सुरेश देशमुख यांचे चिरंजीव सुशील कुमार देशमुख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. माजी खासदार तुकाराम रेंगे मनपा सदस्य सुनील देशमुख गुलमीर खान नदीम इनामदार आदी उपस्थित होते याशिवाय विश्वजीत बुधवंत संग्राम जामकर व मिराज खान शेरखुल खान पठाण यांनी अर्ज दाखल केले . विद्यमान आमदार विप्लोव बिजोरिया यांना उमेदवारी मिळाली नाही दोन जून रोजी अर्जाची छाननी होणार आहे चार जून उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक आहे त्यानंतर या या निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल.

# जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीला कंत्राटदारांचे ग्रहण!

पान 1 वरून ->

झाले आहे. त्यामुळे संबंधित विभागाने कामाच्या प्रगतीचा आणि देयकांच्या प्रक्रियेचा सखोल आढावा घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

प्रशासकीय राजवटीतही कामाला गती नाही

मागील काही महिन्यांत जिल्हा परिषदेत प्रशासकीय राजवट होती. या काळात कोणतेही लोकप्रतिनिधी निर्णय प्रक्रियेत सहभागी नव्हते. संपूर्ण प्रकल्प प्रशासन आणि संबंधित यंत्रणांच्या नियंत्रणाखाली होता. त्यामुळे कामातील विलंबासाठी लोकप्रतिनिधींना जबाबदार धरण्यापेक्षा अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यातील समन्वयाचा अभाव, नियोजनातील त्रुटी किंवा कामाबाबतची उदासीनता कारणीभूत असल्याची चर्चा जिल्हा परिषद वर्तुळात रंगू लागली आहे.


स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लागू असलेल्या आचारसंहितेमुळे काही निर्णय प्रक्रियांना विलंब झाल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असला, तरी मुदत संपूनही काम पूर्ण न होणे आणि त्याचवेळी मोठ्या प्रमाणावर बिलांची उचल झाल्याने या कारणांवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

पाहणीदरम्यान सभापती सचिन गरड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना उर्वरित सर्व कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. मात्र वारंवार सूचना, पाहण्या आणि मुदतीनंतरही कामे रखडत असल्याने आता या संपूर्ण प्रकरणात जबाबदारी निश्चित करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

नागरिकांच्या कराच्या पैशातून उभारल्या जाणाऱ्या या महत्त्वाच्या प्रकल्पाला जर कंत्राटदाराच्या संथ आणि निष्काळजी कारभारामुळे ग्रहण लागले असेल, तर संबंधितांवर कठोर कारवाई करून प्रकल्प तातडीने पूर्ण करावा, अशी मागणी जिल्हा परिषद वर्तुळातून आणि नागरिकांकडून होत आहे.

# 'रुजवावे पसायदान ओठी' : करुणा, संघर्ष आणि सामाजिक बांधिलकीचा शब्द साज

मराठी कवितेच्या विशाल आकाशात काही कवी चंद्रासारखे झळकतात, काही सूर्याप्रमाणे प्रखर तेज देतात; पण काही कवी असे असतात की ते दीपस्तंभासारखे उभे राहून अंधारात दिशाहीन झालेल्या समाजाला मार्ग दाखवतात. 'रुजवावे पसायदान ओठी' हा डॉ. गिरीश लटके यांचा काव्यसंग्रह अशाच एका दीपस्तंभाची प्रकाशरेषा आहे. हा कविता संग्रह डॉ. लटके या संवेदनशील कार्यकर्त्याच्या अंतःकरणात सतत पेटलेल्या मानवतेच्या अखंड ज्योतीचे शब्दरूप आहे.




(पुस्तक परीक्षण : नवनाथ आनंदा रणखांबे )

या संग्रहाच्या मनोगतातून उलगडणारा डॉ. लटके यांचा जीवनप्रवास पाहिला की, त्यांची कविता ही कागदावर जन्मलेली नसून जीवनाच्या खडकाळ वाटांवर चालताना साचलेल्या अनुभवांची नदी आहे, याची जाणीव होते. जबलपूरच्या मातीत जन्मलेला आणि कल्याणच्या सामाजिक वास्तवात घडलेला हा कवी भाषांच्या सीमारेषा ओलांडत माणुसकीच्या विश्वात प्रवेश करतो. हिंदी आणि मराठी या दोन भाषांच्या संगमातून तयार झालेली त्यांची काव्यदृष्टी जणू दोन नद्यांच्या संगमातून निर्माण झालेल्या विशाल प्रवाहासारखी आहे.

डॉ. लटके यांच्या कवितेचे वैशिष्ट्य म्हणजे तिची सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव. आज अनेकदा कविता ही केवळ भावनांची सजावट बनते; पण येथे कविता म्हणजे समाजाशी केलेला संवाद आहे. ती विचार पीठावरून दिलेले भाषण नाही आणि घोषणांची पुनरावृत्तीही नाही. ती जखम पाहून वाहणाऱ्या रक्ताची वेदना आहे. समाजातील उपेक्षित, वंचित, श्रमिक, संघर्षशील माणसांविषयी असलेली करुणा त्यांच्या शब्दांतून सातत्याने झिरपत राहते.

या संग्रहाचे शीर्षकच अत्यंत अर्थपूर्ण आहे. 'रुजवावे पसायदान ओठी' ही केवळ संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानाची आठवण नाही; तर प्रत्येकाच्या ओठी मानवतेची प्रार्थना असावी, समतेचे बीज अंकुरावे आणि करुणेचे बोधी पिंपळ वृक्ष बहरावे, अशी जीवनदृष्टी आहे. जसा शेतकरी काळजीपूर्वक बी पेरतो आणि त्याच्या वाढीची वाट पाहतो, तसाच हा कवी समाजाच्या मनामनांत माणुसकीची बीजे रुजवण्याचा प्रयत्न करतो आहे.

डॉ. लटके यांची कविता गावाकडच्या मातीतल्या विहिरीच्या पाण्यासारखी आहे साधी, सरळ आणि जीवनदायी आहे. त्यांच्या शब्दांना कृत्रिमतेचा मुलामा नाही. त्यामुळे कविता वाचताना आपण एखाद्या कवीला नव्हे तर जीवनाच्या शाळेतला अनुभवी शिक्षक, सामाजिक कार्यकर्ता आणि माणसांवर प्रेम करणारा सहप्रवासी यांना भेटत असल्याचा भास होतो. या संग्रहातील कवितांच्या पाठीमागे उभा असलेला कवी हा केवळ साहित्यिक नाही; तो डॉक्टर आहे, कार्यकर्ता आहे, समाजसेवक आहे आणि संघर्षातून घडलेला विचारवंत आहे. म्हणूनच त्यांच्या एकूण ५४ कवितेला जीवनाचे अनेक दुःख, वेदना, संघर्ष, सत्य, देशप्रेम, माणूस पण, गावाबाहेरच्या गावाचे वर्णन, विद्या, प्रेम, आई, शिक्षक, चळवळ, सत्याची धरलेली वाट, अनिष्ठ रूढी परंपरेवर हल्ला, मराठी भाषेची होणारी पीछेहाट , वासनागंध नजरा, कवितेला साथ मागणारा भाव आदी. विविध रंग लाभलेले दिसतात. कधी ती अन्यायाविरुद्धचा हुंकार बनते, कधी माणुसकीची प्रार्थना बनते, तर कधी स्वपरीक्षणाचा शांत स्वर धारण करतांना दिसून येते.

मनोगतात कवीने सांगितलेला त्यांचा सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय प्रवास या कवितांना अधिक अर्थपूर्ण बनवतो. त्यांनी अनुभवलेले वास्तव त्यांच्या कवितेच्या मुळाशी आहे. त्यामुळे या कविता कल्पनांच्या महालात राहात नाहीत; त्या धुळीने माखलेल्या रस्त्यावरून चालतात. सामान्य माणसांच्या दुःखाचा स्पर्श त्यांना आहे. म्हणूनच या कविता वाचताना वाचकाला स्वतःच्या जीवनाचे प्रतिबिंब त्यात दिसते. डॉ. लटके यांच्या कवितेतील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे आशावाद. त्यांनी समाजातील विसंगती पाहिल्या आहेत, संघर्ष अनुभवले आहेत, अन्यायाचे चटके सोसले आहेत; पण तरीही त्यांच्या कवितेत निराशेचा अंधार नाही. उलट त्या कविता पहाटेच्या पहिल्या किरणासारख्या वाटतात. त्या सांगतात की अंधार कितीही दाट असला तरी प्रकाशाचा जन्म थांबत नाही. हा संग्रह वाचताना गौतम बुद्धांची करुणा, संत कबीरांचे निर्भीड सत्य आणि संत ज्ञानेश्वरांची विश्वकल्याणाची प्रार्थना यांचे प्रतिबिंब जाणवते. कवी स्वतःची स्वतंत्र वाट तयार करतो आहे. त्यांची कविता उपदेश करत नाही, ती विचार करायला भाग पाडते. ती बोट दाखवत नाही, तर अंतर्मनात आरसा उभा करते. या संग्रहातील प्रत्येक कविता जणू एका मोठ्या प्रार्थनेचा भाग आहेत. ही प्रार्थना कोणत्याही एका धर्माची नाही; ती मानवतेची आहे. ती मंदिरातील घंटानादासारखी नाही, तर उपाशी माणसाच्या पोटातील भुकेची जाणीव आहे. ती राजकीय घोषणा नाही, तर सामाजिक समतेची आकांक्षा आहे.

'चेतना रे...' या कवितेत कवीने भूक, संघर्ष, समता आणि संविधान रक्षणाचा संदेश प्रभावीपणे मांडला आहे. बाबासाहेबांच्या विचारांची मशाल पुन्हा प्रज्वलित करण्याचे आवाहन करताना कवी म्हणतो,....

*'तुझ्या पोटातील भुकेची आग*
*माझ्या मस्तकात विचारांची आग*
*विझली रे विझली ती पुन्हा पेटवा रे*
*माझ्या बाबाचे विचार चेतवा रे...'*

या ओळींमधून सामाजिक अन्यायाविरुद्ध जागृतीची ठिणगी दिसते. तसेच,

*'धोका संविधानाला दिसतोय स्पष्ट*
*पुढच्या पिढीसाठी घ्या रे कष्ट'*

या ओळी संविधान, समता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देतात. साधी, घोषणात्मक आणि जनजागृती करणारी ही कविता बाबासाहेबांच्या विचारांचा जागर करणारी प्रेरणादायी रचना ठरते.

'सत्य' या कवितेत कवी म्हणतो आहे,

*'प्रत्येक सत्य का दडवले जाते?*
*संगनमताने का दडपले जाते?'*

या ओळी समाजातील सत्याच्या गुदमरलेल्या वास्तवावर नेमके भाष्य करतात. सत्य दडपण्याच्या प्रवृत्तीवर प्रश्नचिन्ह उभे करत कवी वाचकाला स्वपरीक्षणासाठी प्रवृत्त करतो. अल्प शब्दांत मोठा वैचारिक आशय व्यक्त करणारी ही चिंतनशील कविता आहे.

'साप' या कवितेत अलवार व्यक्त होताना कवी म्हणतो आहे,

*'माझ्या मनी फुले शाहू आंबेडकर विचारांचा जोम !'*

आणि कवितेच्या शेवटी...

*'मी नारळामागचा साप नव्हे, मी तर मानवी प्रतिभा आहे !'*

या ओळींमधून कवी अंधश्रद्धा, कर्मकांड आणि दांभिकतेला ठामपणे नाकारत मानवतावादी व परिवर्तनवादी विचारांचा पुरस्कार करतो. स्वाभिमान, विवेक आणि सामाजिक जागृतीचा संदेश देणारी ही 'फुले शाहू आंबेडकर' विचारांवर चालणाऱ्या कवीची प्रभावी कविता आहे.

'सूर्यही खोटा' या कवितेत कवी म्हणतो आहे,

*'विषमतेचे काटेरी कुंपण मानवतेचे बाटले अंगण'*

शेवटी व्यक्त होतो, ....

*'उगवतीचा सूर्य ही मज वाटे खोटा.'*

या ओळींमधून सामाजिक विषमतेची विदारकता आणि अन्यायग्रस्त मनाची वेदना व्यक्त होते. समतेचा प्रकाश हरवलेल्या व्यवस्थेवर कवीने तीक्ष्ण उपरोध केला आहे.

पुढे 'तडफड' या कवितेत कवी व्यक्त होताना म्हणतो आहे,

*'अशी झिंग नवी चढेल बेहोशीची*
*विचार रुजतील नव्या जातीयवादी पोथीची'*

कवितेच्या शेवटी म्हणतो,

*'माझे सत्शील मन मात्र हे पाहून तडफडते आहे'*

या ओळी समाजात वाढत चाललेल्या जातीयतेच्या आणि वैचारिक भ्रमाच्या धोक्याची जाणीव करून देतात. लोकशाही मूल्यांच्या ऱ्हासाबद्दलची कवीची अस्वस्थता आणि सामाजिक सजगतेची तडफड प्रभावीपणे व्यक्त झाली आहे.

'बळी ..' या कवितेत मध्यभागी कवी पुढीलप्रमाणे व्यक्त होतो आहे,

*'परी हरलो पुन्हा पुन्हा आपल्या माणसांसाठी'*

पुढे कवितेच्या शेवटी कवी म्हणतो,

*'का बळी मागती माझ्या विचारांचे?'*

या ओळींमधून विचारनिष्ठ बाबासाहेबांच्या वाटेवर चालणाऱ्या कार्यकर्त्याची अंतःकरण हेलावून टाकणारी वेदना व्यक्त होते. समाजासाठी झटणाऱ्या व्यक्तीला स्वतःच्या माणसांकडूनच होणाऱ्या उपेक्षेचा आणि विचारांच्या बळीचा प्रश्न कवीने अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे. ही कविता निष्ठा, संघर्ष आणि वैचारिक प्रामाणिकतेचा मार्मिक दस्तऐवज ठरते.

या संग्रहातील कविता तू अशी, आई, ज्ञान, पिंडदान, समाधी, दंग, आदी. कविता या पुन्हा पुन्हा वाचाव्या वाटतात. पुस्तकाचे मुखपृष्ठ ही अत्यंत बोलके आहे. पिंपळाच्या पानाचे चित्र आणि त्यासोबतचे शीर्षक यांचा सुंदर संगम दिसतो. भारतीय संस्कृतीत बोधी वृक्ष पिंपळ हे ज्ञान, चैतन्य आणि शाश्वततेचे प्रतीक मानले जाते. त्या पानाच्या शिरांप्रमाणेच या संग्रहातील कविता समाजाच्या विविध स्तरांशी जोडलेल्या आहेत. कवितासंग्रहातील कविता छान आहे. मुखपृष्ठ पाहतानाच वाचकाला एका वैचारिक प्रवासाचे आमंत्रण मिळते. आई यमुनाबाई आणि पत्नी कुसुम यांना अर्पण केलेला हा संग्रह कवीच्या संवेदनशील मनाचा पुरावा आहे. ज्या नात्यांनी त्यांना घडवले, त्यांच्याप्रती व्यक्त केलेली ही कृतज्ञता संग्रहाला अधिक मानवी बनवते. एकंदरीत, 'रुजवावे पसायदान ओठी' हा काव्यसंग्रह म्हणजे शब्दांचा उत्सव नसून मूल्यांचा महोत्सव आहे. ही कविता फुलांच्या सुगंधासारखी मनात दरवळते, नदीच्या प्रवाहासारखी विचारांना दिशा देते आणि दीपाच्या ज्योतीसारखी अंतर्मन उजळवते. आजच्या असंवेदनशील, धावपळीच्या आणि स्वार्थकेंद्रित काळात हा संग्रह माणुसकीचा हात धरून चालायला शिकवतो. डॉ. गिरीश लटके यांच्या कवितेचा गाभा एका वाक्यात सांगायचा तर तो असा, 'ही कविता फक्त वाचण्यासाठी नाही, तर जगण्यासाठी आहे; ती शब्दांत लिहिलेली नसून माणुसकीच्या शाईने मनावर कोरलेली आहे.' हा वाचनीय कवितासंग्रह सर्वांनी संग्रही ठेवायला हवा.

- पुस्तक : रुजवावे पसायदान ओठी
- कवी : डॉ. गिरीश लटके
- प्रकाशन : मैत्री पब्लिकेशन
- पृष्ठसंख्या : ७२
- कविता : ५४
- मूल्य : रु. १२०
- **पुस्तक परीक्षक :- नवनाथ आनंदा रणखांबे**

( कवी/लेखक, समीक्षक व साहित्य अभ्यासक. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय विविध पुरस्कारांनी सन्मानित, विविध वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड धारक)

## देवगिरी व्हॅली सोसायटीची निवडणूक बिनविरोध




हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, शहरातील प्रतिष्ठित व सर्वात मोठ्या गृहनिर्माण संस्थांपैकी एक असलेल्या देवगिरी व्हॅली को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीची निवडणूक प्रक्रिया खेळीमेळीच्या वातावरणात बिनविरोध पार पडली. जवळपास 400 सभासद असलेल्या या सोसायटीची निवडणूक बिनविरोध होणे ही विशेष बाब मानली जात असून परिसरातील नागरिकांनी त्याचे स्वागत केले आहे.

मागील महिनाभर सुरू असलेली निवडणूक प्रक्रिया शनिवारी यशस्वीरित्या पूर्ण झाली. निवडणूक अधिकारी तसेच सहाय्यक निबंधक कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या निवड प्रक्रियेत अध्यक्षपदी कैलास आव्हाळे, उपाध्यक्षपदी सनी सेठ पितळे, सचिवपदी अशोक कमोदकर, कोषाध्यक्षपदी मुक्तेश्वर पवार आणि सहसचिवपदी भागिनाथ पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

तसेच संचालक म्हणून शिवसिंग कुकलारे, दिनकर वाघमारे, भारत निकम, केशव सूर्यवंशी, मनोज मत्ते, प्रवीन हिवाळे, शोभा सुनील तुपे, ताराबाई भास्कर शेजवळ, सत्यवान बादाडे, किरण थोरात, किशोर लाहोट आणि मधुसूदन झांबरे यांची निवड करण्यात आली.

विशेष म्हणजे काही सभासदांनी संचालकपदासाठी निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र, संस्थेच्या हिताला प्राधान्य देत सर्वांनी समंजस भूमिका घेतल्याने निवडणूक बिनविरोध पार पडली. त्यामुळे सोसायटीमध्ये एकोप्याचे आणि सौहार्दाचे वातावरण असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

नवीन कार्यकारिणीच्या निवडीनंतर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अंबादास मस्के तसेच पडेगाव शिवसेना प्रमुख राहुल येल्दी यांनी पदाधिकारी व संचालकांचे अभिनंदन करून पुढील विकासकामांसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# महिला बचत गट कर्ज गैरव्यवहार प्रकरणाला नवे वळण; तत्कालीन बँक व्यवस्थापकाची चौकशीची करा

### पंचायत समिती सदस्य राहुल राठोड यांचे बँक ऑफ महाराष्ट्राला लेखी निवेदन; थर्ड पार्टी खात्यावर निधी वर्ग केल्याचा आरोप

**फर्दापूर :** सोयगाव तालुक्यातील वरखेडी (बु.) येथील महिला बचत गटांच्या कर्ज गैरव्यवहार प्रकरणाला नवे वळण मिळाले असून पंचायत समिती सदस्य राहुल राठोड यांनी या प्रकरणी बँक ऑफ महाराष्ट्र, फर्दापूर शाखेचे तत्कालीन व्यवस्थापक निखिल तायडे यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. याबाबत त्यांनी बँकेला लेखी निवेदन दिले आहे.

**महिला बचत गटाला कर्ज मंजूर करताना संबंधित गटातील सर्व महिलांच्या उपस्थितीत त्यांच्या सह्या व छायाचित्र घेणे बंधनकारक असते. मात्र या प्रकरणात कर्ज मंजुरी पत्रावर बनावट सह्या करण्यात आल्या.तसेच बचत गटातील वास्तविक सदस्यांऐवजी इतर महिलांचे छायाचित्र घेऊन कर्जाची रक्कम तिसऱ्याच व्यक्तीच्या खात्यात वर्ग करण्यात आली. हा प्रकार अत्यंत गंभीर असून त्यामुळे बँकेच्या कार्यपद्धतीसह तिच्या विश्वासार्हतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच संबंधित महिला बचत गटाला न्याय मिळावा यासाठी बँक प्रशासनाने तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे.**



वरखेडी (बु.) येथील रोशन महिला बचत गट व विराट बचत गट या दोन गटांच्या नावावर मंजूर झालेल्या कर्ज रकमेत गैरव्यवहार झाल्याचा आरोप यापूर्वी महिलांनी केला होता. बचत गटातील महिलांच्या माहितीशिवाय कर्ज प्रक्रिया पूर्ण करून प्रत्येकी दीड लाख रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले. त्यानंतर ही रक्कम गटातील महिलांच्या खात्यात जमा न करता तिसऱ्याच व्यक्तीच्या खात्यावर वर्ग करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

राहुल राठोड यांनी दिलेल्या निवेदनानुसार, समुदाय साधन व्यक्ती (सीआरपी) दाळीबाई राणीदास चव्हाण आणि तत्कालीन शाखा व्यवस्थापक निखिल तायडे यांनी संगनमत करून बनावट सह्या, कागदपत्रे व प्रक्रिया वापरून हा व्यवहार केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. पंचायत समितीने नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालातही सीआरपी दाळीबाई चव्हाण यांनी गैरप्रकार केल्याची बाब समोर आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, कर्ज मंजूर झाल्यानंतर नियमानुसार गटातील सर्व महिलांची उपस्थिती व संमती घेणे अपेक्षित असताना तसे न करता प्रत्येकी दीड लाख प्रमाणे एकूण तीन लाख रुपये कर्जाची रक्कम राणीदास शांतीलाल चव्हाण या व्यक्तीच्या

## 3 दुचाकींसह तब्बल 5 गुन्हे उघड; सराईत चोरटा जेरबंद

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील हर्सल भागात दुचाकी वाहने चोरी करणाऱ्या आणि दुकानांची शटर्स फोडून चोऱ्या करणाऱ्या एका सराईत चोरट्याला हर्सल पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. आरोपीकडून ३ मोटारसायकल, रोख रक्कम आणि हार्डवेअरचे साहित्य असा एकूण २ लाख ४२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, यामुळे हर्सल पोलीस ठाण्यातील तब्बल ५ गुन्हे उघडकीस आले आहेत. अनिस खान बाबा खलील खान ( रा. सईदा कॉलनी, छत्रपती संभाजीनगर)असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



हर्सल येथील रहिवासी बंडु शामराव दुधे यांनी ३० मे २०२६ रोजी पोलीस ठाण्यात त्यांच्या दुचाकी चोरीबाबत तक्रार दिली होती. त्यानुसार भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करत असताना, हर्सल पोलीस ठाण्याच्या डी.बी. (गुन्हे शोध) पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, दुचाकी चोरीतील अज्ञात आरोपी चोरीच्या मुद्देमालासह जमनजोती रोडवरील कबीरमठ भागात थांबला आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने पोलीस निरीक्षक स्वाती केदार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष शोध पथकाने कबीरमठ भागात सापळा रचला. पोलिसांना पाहून आरोपी अनिस खान पळून जाण्याच्या तयारीत असताना, पथकाने त्याला शिताफीने ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपीला विश्वासात घेऊन चौकशी केली असता, त्याच्याकडे एक 'ड्रीम युगा' (क्रमांक MH-20 DX-0420) आणि इतर दोन दुचाकी आढळल्या. या दुचाकी त्याने हर्सल जेल परिसर व इतर भागांतून चोरल्याचे मान्य केले.

आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे ६,५०० रुपये रोख आढळले. अधिक चौकशीत त्याने हरसिद्धी नगर येथील दत्त मंदिर आणि कोलठाणवाडी रोडवरील एका डेअरीचे शटर फोडून ही रक्कम चोरल्याची कबुली दिली.

## ‘मृग’ संकल्पनेतून कला, अध्यात्म आणि निसर्गाचा अनोखा संगम



हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महागमी गुरुकुल येथे आयोजित करण्यात आलेल्या २९ व्या साधना गुरुकुल शिबिराचा समारोप नृत्य, संगीत आणि दृश्यकलेच्या बहारदार सादरीकरणाने झाला. ‘मृग’ (हरिण) या संकल्पनेवर आधारित आठवडाभर चाललेल्या या शिबिरात ४० हून अधिक साधकांनी गुरुकुल जीवनशैलीचा अनुभव घेत विविध कलांमधून सृजनशील अभिव्यक्ती साकारली. शिबिरादरम्यान दिवसाची सुरुवात योगाभ्यासाने होत असे. त्यानंतर गायन, कथक आणि ओडिसी नृत्याचे प्रशिक्षण दिले जात होते. दुपारच्या सत्रांमध्ये चित्रकला, मातीकाम, सर्जनशील कला आणि संस्कृत या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. यंदाच्या शिबिरासाठी ‘मृग’ ही मध्यवर्ती संकल्पना निवडण्यात आली होती. हरिणाच्या प्रतिमेतील निसर्ग, सौंदर्य, चंचलता, मृगजळ आणि आध्यात्मिक शोध या विविध पैलूंचा कलात्मक माध्यमांतून वेध घेण्यात आला.

## अहिल्यादेवींचा आदर्श समोर ठेवून एकल मातांनी आत्मविश्वासाने उभे राहावे




हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त बालोन्नती फाउंडेशनच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेअंतर्गत एकल माता, एकल पालकांच्या कुटुंबातील मुली आणि किशोरींसाठी ‘पूर्णांगिनी माऊली सुरक्षित लेक’ या विशेष प्रबोधन व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमातून महिला सक्षमीकरण, बालसुरक्षा आणि आत्मविश्वासपूर्ण जीवन जगण्याचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. रेणुका भावसार यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याचा संदर्भ देत उपस्थित महिलांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. जीवनात वैधव्य किंवा इतर संकटे आली तरी त्यातून खचून न जाता धैर्याने आणि आत्मविश्वासाने उभे राहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. वैयक्तिक दुःखावर मात करून अहिल्यादेवींनी समाजासाठी केलेले कार्य आजच्या महिलांसाठी आदर्शवत असल्याचे त्यांनी नमूद केले.

समाजात घडणाऱ्या विविध अस्वस्थ करणाऱ्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महिलांचे आणि मुलींचे प्रबोधन, स्वसंरक्षण प्रशिक्षण तसेच बालसुरक्षेबाबत जागृती निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मुलांच्या सुरक्षिततेसाठी आणि उज्ज्वल भवितव्यासाठी प्रथम मातांचे सबलीकरण आवश्यक असल्याचे त्या म्हणाल्या.

## नगरसेवकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर; शिवसेनेचे पोलीस आयुक्तांना निवेदन

**छत्रपती संभाजीनगर :** सोमवार, 1 जून रोजी युवासेना मराठवाडा निरीक्षक तथा शिवसेना नगरसेवक ऋषिकेश सरोज प्रदीप जैस्वाल यांना जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. तसेच मनपा आणि पोलीस विभागातील महिला अधिकारी यांच्यासह जैस्वाल कुटुंबियांना शिवीगाळ केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला. या दोन्ही संतापजनक घटनेच्या निषेधार्थ शिवसेना छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांना निवेदन देण्यात आले. लोकप्रतिनिधी आणि महिला अधिकाऱ्यांना शिवीगाळ करणाऱ्यास मुजोर आणि धर्मांध लोकांना धडा शिकवण्याची मागणी करण्यात आली.



यावेळी शिवसेना शहरप्रमुख विश्वनाथ राजपूत, मनपा गटनेते किशोर नागरे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख चंद्रकांत इंगळे, उपशहरप्रमुख तिलक भुरीवाले, संतोष तळेकर, रमेश सूर्यवंशी, गणेश पवार, महिला आघाडी उपजिल्हासंघटक रेणुका गायकवाड, उपजिल्हा संघटक सुषमा यादगिरे, शहरसंघटक संगीता बोरसे, राहुल देवगिरीकर, विधानसभा संपर्कप्रमुख सागर खरगे, सागर कर्डक, संतोष बडे, तेजस पाटील, अनिकेत जैस्वाल, सनी पारसवार, निखिल चव्हाण, अनिल सोनवणे , पवन पारसवार, उमेश पय्येवाल, सागर खत्री, देवा अडणे, सागर ठाकूर, गणेश शर्मा, आदित्य शर्मा, सौरभयादव, राज जैस्वाल, राजू चोपडे, संतोष काळे, हर्षल पवार, अविष्कार राजपूत, कुणाल हापसे, अमोल काळे, राजू नेमाने, संदीप देऊळगावकर, अक्षय लिंगायत, शिवम इंगळे आदींसह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी यांच्यासह पदाधिकारी, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी निवेदन म्हंटले की, ऋषिकेश जैस्वाल हे शिवसेना युवासेना व लोकांच्या कामासाठी मुंबई, मराठवाडा विभागात ते कार्यरत आहे. त्यांचा प्रभाग क्र. 15 शाहगंज येथे नागरिकांच्या मागणीनुसार अतिक्रमण हटाव मोहीम राबवत असताना त्यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. एवढेच नव्हे तर गोळी मारू, कापून टाकू अशा व्हिडिओ व्हायरल झाला. तसेच अतिशय खालच्या दर्जाचे शब्द वापरून शिवीगाळ केली. जैस्वाल कुटुंबीय हे गेल्या 40 वर्षांपासून समाजसेवा करत असताना त्यांनी अद्याप कुणाला त्रास दिला नाही. सर्व समाजाला न्याय देण्याचे काम केले. मात्र, सोमवारी 1 जून रोजी जैस्वाल कुटुंबीय आणि मनपा अधिकाऱ्यांना व महिला पोलीस अधिकाऱ्यांना शिव्या देण्याचा प्रकार अत्यंत निंदनीय व संतापजनक आहेत. यामुळे महिला आणि हिंदू धर्मात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## खरीप हंगामासाठी कृषी विभाग सज्ज; दर्जेदार निविष्ठा वेळेत मिळण्यासाठी विभागीय भरारी पथके कार्यरत

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते आणि कीडनाशके योग्य दरात व वेळेत उपलब्ध व्हावीत यासाठी कृषी विभागाने कडक नियोजन केले असून छत्रपती संभाजीनगर विभागात विशेष भरारी पथके सज्ज करण्यात आली आहेत. साठेबाजी, कृत्रिम टंचाई, जादा दराने विक्री किंवा बनावट कृषी निविष्ठांचा पुरवठा करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा कृषी विभागाने दिला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांमध्ये कृषी निविष्ठांच्या विक्री व पुरवठ्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी विभागीय भरारी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या पथकाच्या प्रमुखपदी तंत्र अधिकारी ए. एल. काळुशे यांची नियुक्ती करण्यात आली असून पी. ए. ताजने हे मोहीम अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. एच. एस. कातोरे (जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक) हे सदस्य तर एस. जी. बंडगर (विभागीय गुणनियंत्रण निरीक्षक) यांची सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी कृषी विभागाने विक्रेते, वितरक आणि उत्पादकांवर बारकाईने लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. कृषी निविष्ठांची साठेबाजी, जादा दराने विक्री अथवा इतर कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास संबंधित विक्रेत्यांचे परवाने तात्काळ रद्द करण्यात येणार आहेत. तसेच गंभीर स्वरूपाच्या गैरव्यवहारांमध्ये दोषींवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## जुगाराच्या वादातून निवघा येथे युवकाची चाकूने भोसकून हत्या

हदगाव/प्रतिनिधी-

हदगांव निवघा येथे जुगाराच्या डावावरून झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर रक्तरंजित हाणामारीत होऊन एका २४ वर्षीय तरुणाची चाकू भोसकून निघृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. विजय नारायण कदम (वय २४, रा. निवघा) असे मृत युवकाचे नाव असून, या प्रकरणी हदगाव पोलिसांनी तत्पर कारवाई करत दोन आरोपींना अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवार दि.३१ मे रोजी रात्री साडेआठच्या सुमारास निवघा येथील नवी आबादी अण्णाभाऊ साठे चौक परिसरात काही युवक पत्त्यांचा जुगार खेळत होते. यावेळी विजय कदम याच्याजवळील रोख रक्कम संपल्याने त्याने सोबतच्या व्यक्तींना मी ऑनलाइन पैसे पाठवतो, तुम्ही मला रोख रक्कम द्या अशी विनंती केली. मात्र, याच आर्थिक व्यवहारावरून उपस्थितांमध्ये शाब्दिक वाद सुरू झाला. क्षणात वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपी अब्दुल शेख मुजीब, शाहिद पठाण, तब्बू शेख (रा. उमरखेड जि यवतमाळ) तसेच त्यांच्या

एका साथीदाराने विजय कदम याला मारहाण करण्यास सुरुवात केली. दरम्यान, आरोपी शाहिद पठाण याने जवळील धारदार चाकू काढून विजयवर सपासप वार केले. पोटावर व शरीराच्या महत्त्वाच्या अवयवांवर वार झाल्याने विजय गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच मृत्यू घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी जखमी विजयला तातडीने उपचारासाठी हदगाव उपजिल्हा रुग्णालयात हलविले. मात्र, उपचारासाठी नेत असतानाच वाटेत त्याचा मृत्यू

झाला. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.

## सावरकरांनी जातिची जळमटे केली दूर : डॉ.संजय गायकवाड

**छत्रपती संभाजीनगर:** स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांनी भारतीय जनतेच्या मनातील जातिची जळमटे दूर केली, गायीची पूजा करण्यापेक्षा गोपालन करा,एकाच वेळी दोन जन्मठेप सुनावली गेली, भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी त्यांचे मन वज्राहूनही कठीण होते,असे प्रतिपादन स.भु.महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय गायकवाड यांनी केले.

टिळकनगर येथे सावरकर मित्र मंडळांतर्फे सावरकर जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात त्यांनी वि.दा.यांचा भगुर ते अंदमान जेल असा धगधगता संघर्ष उपस्थितांसमोर उभा केला.यावेळी समर्थांचे अभ्यासक व कार्पोरेट कीर्तनकार समीर लिमये यांची प्रमुख उपस्थिती होती.




वयाच्या बाराव्या वर्षीच तात्यारावांना देश स्वातंत्र्याची ओढ लागली होती.आपल्या हयातीत व नंतरही स्वकियांकडून त्यांना उपेक्षाच अनुभवावी लागली.

सावरकर यांना अत्यंत वेदनादायक काळ्या पाण्याची शिक्षा भोगल्यानंतर अंदमानातून बंगाल तेथून रत्नागिरीच्या तुरूंगात हलविण्यात आले.अंदमानातील कारावासात इंग्रज अधिकारी,कर्मचाऱ्यांकडून प्रचंड यातना दिल्या गेल्या.काही अटी मान्य केल्यावर त्यांनी समाजकारणातून जनतेला जोडले,यात सवर्ण-दलित सामुहिक पंगती आयोजित केल्या.हिंदू केवळ धर्म नाही ,तर समाज असून यातील जातिची जळमटे दूर झाली पाहिजेत. यासाठी ते अविरत प्रयत्नरत राहिले.

मराठी भाषा शुद्धीकरणाचे मोलाचे कार्य सावरकर यांनी केल्याचेही त्यांनी सांगितले.

समर्थ व सावरकर कायम वादात

छत्रपतींची आरती सावरकर लिखित असून त्यात समर्थांचा उल्लेख आहे.


विवेकानंदांचा आम्ही सश्रद्ध पण यांत्रिक हा विचार सावरकरांनी पुढे नेल्याचे यावेळी समीर लिमये यांनी सांगितले. हल्लीच्या मुलांना मराठी की संस्कृत हे कळत नाही ,उत्सवात ढणढणाट करणे हिंदुत्व नव्हे. समर्थांच्या विचारांतून हजारो मुलांना हनुमान उपासना शिकविली गेल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी रवींद्र मुरूगकर,सचिन सृष्टीकर, गजेंद्र तारे,विजय मुळे, गौरव कुलकर्णी,शशिकांत कुलकर्णी,सचिन जोशी,अनिकेत चोबे, उमेश कुलकर्णी, इशान मक्तेदार, सायली पिल्ले,रुपेश बंगाळे आदींनी परिश्रम घेतले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### क्षेत्र वेरूळ येथे मालोजीराजे भोसले गढी वर 352 वा शिवराज्याभिषेक सोहळा दि 6 जून रोजी

# हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत साजरा करणार : राजेंद्र पवार

**खुलताबाद प्रतिनिधी दि २ जून :** स्वराज्य संकल्प भूमी पितृ तीर्थ श्रीक्षेत्र वेरूळ येथे शहाजीराजे भोसले स्मारकासमोर ५१ विविध क्षेत्रातील मान्यवर जोडप्यांच्या हस्ते सामूहिक शिव राज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन श्री क्षेत्र वेरुळ येथे दि ६ जून २०२६ रोजी सकाळी आठ वाजता करण्याचे योजिले असून या सोहळ्यासाठी छत्रपती संभाजी नगर जिल्हा व महाराष्ट्र मधील ५१ मान्यवरांची सह पत्नीक उपस्थिती राहणार असून त्यांच्या शुभ हस्ते छत्रपती शिवरायांच्या ५१ मूर्तींचा सामूहिक अभिषेक संपन्न होणार आहे हा सोहळा देशभरात मोठ्या उत्साहामध्ये संपन्न होत असतो विशेषता स्वराज्याची राजधानी रायगड या ठिकाणी लाखो मावळ्यांच्या उपस्थितीमध्ये भव्य दिव्य प्रमाणे हा सोहळा साजरा होत असतो मागील २ वर्षापासून मालोजीराजे भोसले गढीवर हा सोहळा दरवर्षी करण्याचा मानस स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार व त्यांच्या मित्र परिवाराचे वतीने करण्यात येत आहे हे ३ रे वर्ष आहे . सोहळा आयोजन करण्या मागचा हेतू असा आहे की स्वराज्याचा संकल्प ज्या पवित्र भूमीमध्ये झाला ती भूमी म्हणजे श्रीक्षेत्र वेरूळ या ठिकाणी छत्रपती शिवरायांचे पूर्वज बाबाजी राजे भोसले मालोजीराजे भोसले यांचे पुत्र शहाजीराजे भोसले यांनी स्वराज्य निर्माण करण्याचा संकल्प भगवान घृष्णेश्वराच्या साक्षीने केला होता या पवित्र व पराक्रमी भूमीमध्ये बाबाजीराजे भोसले ,मालोजीराजे भोसले, विठोजीराजे भोसले ,शहाजीराजे भोसले त्यांचे बंधू शरीफ जिराजे भोसले, व्यंकोजीराजे भोसले, छत्रपती शिवरायांचे थोरले बंधू संभाजीराजे भोसले यांचा जन्म या पवित्र भूमीमध्ये झाला आहे या जागेचे वैशिष्ट्य म्हणजे स्वराज्य संकल्पक्ष शहाजी राजे भोसले व मा जिजाऊ यांच्या विवाह नंतर खूप मोठा काळ मालोजीराजे भोसले गढी मध्ये त्यांचे वास्तव्य होते अशा या पवित्र मातीमध्ये शिवराज्याभिषेक दिन साजरा झाला पाहिजे या पवित्र भावनेने या सोहळ्याची सुरुवात मागील २ वर्षापासून करण्यात आली आहे हे ३ रे वर्ष असून भोसले घराण्याचा उगमस्थान असलेली भूमी वर मोठ्या थाटामाटा मध्ये यावर्षी सुद्धा शिवराज्याभिषेक दिन साजरा होणार आहे.



या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे कोल्हापूर येथून सिंहासनावर बसलेले छत्रपती शिवरायांच्या ५१ शिवमुर्ती अभिषेकासाठी आणण्यात आल्या असून या शिवमुर्तींना अभिषेकासाठी सप्त नद्यांची पाणी, समुद्र जल, पंचामृत, सुवर्णा जल, रजत जल, औषधी जल, फळांचा राजा आमरस अशा १६ प्रकारच्या विविध जलानी निमंत्रित ५१ जोडप्यांच्या हस्ते महाराजांना अभिषेक संपन्न होणार आहे अभिषेक सकाळी बरोबर ८.३० मिनिटांनी सुरू होणारा असून ९.३० वाजता संपन्न होईल.

अभिषेक संपन्न झाल्यानंतर या शिवमूर्ती निमंत्रित मान्यवरांना प्रतिष्ठानच्या वतीने भेट म्हणून देण्यात येईल या सोहळ्याची शोभा वाढवण्यासाठी सर्व मान्यवरांना भगवे फेटे, स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले व छत्रपती शिवराय यांचे स्मारक फुलांनी सजवले जाईल सोबत भालदार, चोपदार ,तुतारी व अभिषेकासाठी आकर्षक बैठक व्यवस्था हे या सोहळ्याचे वैशिष्ट्य असून अभिषेक सोहळा संपन्न झाल्यानंतर सर्वांना प्रसाद देण्यात येईल तरी सर्व शिवभक्तांना आवाहन करण्यात येते की ज्यांना रायगडावर जाणं शक्य नाही त्यांनी शिवराज्याभिषेक दिनी मोठ्या उत्साहाने श्री क्षेत्र वेरूळ येथे या सोहळ्यामध्ये सहभागी व्हावे दरवर्षी या सोहळ्यासाठी विशेषतः साधुसंत व राजकीय क्षेत्रातील सर्व मान्यवरांची उपस्थिती सोहळ्या मध्ये असते यावर्षी सुद्धा अनेक साधुसंतासह जिल्ह्याचे पालकमंत्री संजयजी शिरसाठ साहेब महाराष्ट्र राज्याचे मंत्री महोदय अतुल सावे साहेब जिल्ह्याचे खासदार संदीपानजी भुमरे साहेब माझी अर्थ राज्यमंत्री भागवत जी कराड आ प्रशांत आ रमेश बोलणारे आ संजना ताई जाधव माजी विरोधी पक्ष नेता आ अंबादास दानवे आअनुराधाताई चव्हाण आ सतीश चव्हाण जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे महापौर समीर राजूरकर उपमहापौर राजेंद्र जंजाळ खुलताबाद तालुक्यातील सर्व प्रशासकीय अधिकारी व जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य यासह खुलताबाद तालुक्यातील सर्व पत्रकार बांधव व अभिषेकाला सह पत्नीक उपस्थित राहणारे निमंत्रित मान्यवर यांची उपस्थिती राहणार आहे तरी या पवित्र दिवशी पवित्र व पावन ऐतिहासिक ठिकाणी शिवभक्तांनी मोठ्या संख्येने दि ६ जून रोजी सकाळी ८ वाजता मालोजीराजे भोसले गडी श्री क्षेत्र वेरुळ येथे उपस्थित राहावे असे आव्हान वेरूळ ग्रामस्थ व आयोजक स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी केले आहे..

## मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा तात्काळ रद्द करा : विश्व हिंदू परिषद



हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेला 'मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा' राज्यातील हजारो प्राचीन देवस्थानांवर अन्याय करणारा असून हिंदू धार्मिक संस्थांच्या स्वायत्ततेवर गदा आणणारा आहे. त्यामुळे हा कायदा तात्काळ आणि संपूर्णपणे रद्द करावा, अशी मागणी विश्व हिंदू परिषद, मंदिर अर्चक पुरोहित आयाम, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात अप्पर आयुक्तांना निवेदन देण्यात आले.

यावेळी मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार, प्रकाश कहाळेकर, ॲड. माधव भोकरीकर, सुभाष कुमावत, शशिकांत वाडगावकर आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील देवस्थानांच्या जमिनींवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली असून ती तात्काळ हटवून संबंधित जमिनी पुन्हा देवस्थानांच्या नावावर वर्ग करण्यात याव्यात. तसेच देवस्थानांच्या जमिनींचे संरक्षण, व्यवस्थापन आणि संवर्धनासाठी स्वतंत्र तज्ज्ञ समितीची नियुक्ती करण्यात यावी.

## तुळसाबाई कोठाळे यांच्या प्रयत्नातून केळगाव येथे पाणी टँकर सुरू; ग्रामस्थांना दिलासा



**सिल्लोड, प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील केळगाव येथे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या समस्येवर पंचायत समिती सदस्य सौ. तुळसाबाई अंकुश कोठाळे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून अखेर टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागला असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

केळगाव येथील नागरिकांना पाण्याच्या तीव्र टंचाईला सामोरे जावे लागत असल्याने पंचायत समिती सदस्य सौ. तुळसाबाई कोठाळे यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत पंचायत समितीच्या सभापती सौ. अनिता सुरेश बनकर यांच्याकडे तातडीने प्रस्ताव सादर केला होता. त्यांच्या पाठपुराव्यानंतर प्रशासनाने त्वरित कार्यवाही करत गावासाठी पाणी टँकर मंजूर केला.

याबाबत सभापती सौ. अनिता सुरेश बनकर यांनी सांगितले की, सिल्लोड तालुक्यातील ज्या-ज्या गावांमधून पाणीटंचाईबाबत प्रस्ताव प्राप्त झाले आहेत, त्या सर्व गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्याची अडचण भासू नये यासाठी पंचायत समिती प्रशासन सतर्क असून आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविल्या जात आहेत.

तसेच तालुक्यातील ज्या गावांमध्ये पाण्याची समस्या आहे, त्या ग्रामपंचायतींनी तात्काळ पंचायत समितीकडे प्रस्ताव सादर करावेत. प्रस्ताव प्राप्त होताच संबंधित गावांसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आवाहनही करण्यात आले.

केळगाव येथील ग्रामस्थांनी पंचायत समिती सदस्य सौ. तुळसाबाई अंकुश कोठाळे, सभापती सौ. अनिता सुरेश बनकर व पंचायत समिती प्रशासनाचे आभार व्यक्त केले. लोकप्रतिनिधींच्या पाठपुराव्यामुळे गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# महिलेचा 'सापळा', रिक्षाचालकाला बेदम मारहाण; रिक्षा लुटणाऱ्या तिघांना बेड्या

## सिडको पोलिसांची धडाकेबाज कारवाई; दीड लाखांची रिक्षा व कागदपत्रे जप्त

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर, प्रवासी म्हणून रिक्षात बसलेल्या एका महिलेने साथीदारांच्या मदतीने रिक्षाचालकाला निर्जन ठिकाणी नेऊन मारहाण करत रिक्षा लुटल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणातील तीन आरोपींना सिडको पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत अटक करून लुटलेली रिक्षा, तिची कागदपत्रे आणि चालकाचा परवाना जप्त केला आहे.

बेगमपुरा परिसरातील शेख मोहसीन शेख मुनीर (वय ३८) हे २९ मे रोजी रात्री साडेसातच्या सुमारास मध्यवर्ती बसस्थानक परिसरात रिक्षासह प्रवाशांची वाट पाहत होते. त्यावेळी एका महिलेने मिसारवाडी येथे जाण्यासाठी रिक्षा भाड्याने घेतली. प्रवासादरम्यान तिने आंबेडकर चौकातून मार्ग बदलण्यास सांगत रिक्षा सनी सेंटरजवळील मोकळ्या मैदानाकडे वळवली.

निर्जनस्थळी पोहोचल्यानंतर संबंधित महिलेने रिक्षाचालकाचा मोबाईल घेऊन कोणालातरी फोन केला. काही वेळातच तेथे तीन तरुण आले. त्यांनी रिक्षाचालकाला शिवीगाळ करत बेदम मारहाण सुरू केली. लाथाबुक्क्यांसह धारदार वस्तूने हल्ला करून जखमी केले. त्यानंतर आरोपींनी रिक्षाचालकाला धमकावत त्याची रिक्षा जबरदस्तीने घेऊन पलायन केले.

घटनेनंतर सिडको पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली. गुप्त माहिती, तांत्रिक तपास आणि स्थानिक माहितीदारांच्या मदतीने पोलिसांनी मिसारवाडी परिसरात शोधमोहीम राबविली. तपासादरम्यान शेख मोबीन शेख अजीज (वय ३४, रा. मिसारवाडी) याला ताब्यात घेतले असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्या माहितीवरून उजेब खान वसीम खान (वय २२) आणि अजीम कासिम पठाण (वय २३) या दोघांनाही अटक करण्यात आली.

आरोपींकडून सुमारे १ लाख ५० हजार रुपये किंमतीची एमएच-२०-ईएफ-८७७८ क्रमांकाची रिक्षा, तिची कागदपत्रे आणि फिर्यादीचा वाहनचालक परवाना जप्त करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक निवृत्ती गायके करीत आहेत.

जलद तपासामुळे गुन्हा उघड या कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल येरमे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनिल नाणेकर, निवृत्ती गायके, सहायक फौजदार सुभाष शेवाळे, मंगेश पवार, सहदेव साबळे, विशाल सोनवणे तसेच इतर कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पोलिसांच्या जलद तपासामुळे लुटलेली रिक्षा अल्पावधीतच हस्तगत करण्यात यश आले.

**महिलेच्या भूमिकेचाही तपास :** गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार ठरलेल्या महिलेनेच रिक्षाचालकाला जाळ्यात ओढल्याचा संशय असून तिचा शोध पोलीस घेत आहेत. आरोपींशी तिचे नेमके संबंध काय आणि यापूर्वी अशा प्रकारचे गुन्हे घडले आहेत का, याचाही तपास सुरू आहे.

## परभणी तालुक्यातील इंडेवाडी येथ भिंतकोसळून बालिका दगावली

हिंदू प्रकाश वार्ता परभणी प्रतिनिधी



**परभणी :** वादळी वारा व विजांचा कडकडाट मुसळधार पाऊसात घराची भिंत कोसळून अकरा वर्षीय बालिकेचा मृत्यू झाला. सदरील घटना परभणी तालुक्यातील इंदेवाडी येथें सोमवार दिनांक 1जून रोजी सायंकाळी 6वाजताच्या दरम्यान घडली. दिपाली विजय नदगे वय वर्ष 11 असे मयत झालेल्या मुलीचे नाव आहे या घटनेचे अधिक माहिती अशीकी इंदेवाडी वसाहतीमध्ये विजय नंदगे यांचे कुटुंब वास्तव्यास होते. मूळचे आरळी तालुका बिलोली जिल्हा नांदेड जिल्ह्याचे रहिवासी पण कामानिमित्त इंदेवाडी येथे सालगडी म्हणून एका शेतावर कामास होते. सोमवार दिनांक 1 जून रोजी सायंकाळी सुमारास इंदेवाडी परिसरात जोराचे वादळ वारे व विजांचा कडकडासह मुसळधार पाऊस सुरू झाला विजयनगर यांच्या पत्नी आणि मुलगी सुसाट वाऱ्यामुळे घरावरची पत्रे उडाली याचवेळी अचानकपणे दिपाली विजय नंदगे वय वर्ष 11 तिच्या अंगावर भिंत पडल्याने डोक्याला गंभीर इजा होऊन तीचा जागीच मृत्यू झाला या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी धाव घेतली व संबंधित यंत्रणेला माहिती देण्यात आली.





छत्रपती संभाजीनगर : चंपाचौकात अवजड वाहनामुळे रात्री 8 ते 9 वाजेपर्यंत तासभर वाहतुकीची मोठी कोंडी झाल्याने नागरिकांना नाहक त्रास व मनस्ताप भोगावा लागला.

## खासदार क्रीडा महोत्सवात खांड्रे यांचा गौरव



**छत्रपती संभाजीनगर:** नागपूर येथे आयोजित खासदार क्रीडा महोत्सवात छत्रपती संभाजीनगर येथील क्रीडा संघटक प्रदीप खांड्रे यांना गौरविण्यात आले.केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते, 'महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटने'चे सहसचिव म्हणून निवड झाल्याबद्दल हा सत्कार करण्यात आला.तसेच याप्रसंगी देशाचे नागरी विमानन आणि सहकार राज्यमंत्री तसेच महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे उपाध्यक्ष आणि या कार्यक्रमाचे आयोजक संदीप जोशी,सरचिटणीस संजय शेटे,उपाध्यक्ष स्मिता शिरोळे -यादव आणि समितीच्या इतर सदस्यांची उपस्थिती होती.

गेली ८ वर्षे सातत्य आणि यशस्वीपणे 'खासदार क्रीडा महोत्सव, नागपूरचे आयोजन करण्यात येते.महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या सर्व नवनिर्वाचित सदस्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्राच्या विकासात योगदान देण्याच्या माझ्या प्रयत्नांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल आणि प्रोत्साहनाबद्दल मी खरोखरच अत्यंत सन्मानित आणि कृतज्ञ आहे.

## सावकर जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण



**छत्रपती संभाजीनगर:** स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर मित्र मंडळ यांच्यावतीने 143 व्या जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण रोपळेकर चौक टीळकनगर येथे करण्यात आले.ही स्पर्धा तीन गटातझाली. बालगटासाठी सावरकरांचे तीन मित्र पुस्तक,पेन आणि विज्ञान,वीर सावरकर वीर भारतमातेचा मुलगा,महाविद्यालयीन गटात 1857 चा स्वातंत्र्य समर - इतिहास की दृष्टिकोन व खुल्या गटात सावरकर असते तर 2026 च्या भारतासाठी पाच प्राधान्य काय असते आणि सावरकरांच्या नजरेतून माझा भारत 1947 वि.2026 या विषयांवर घेण्यात आली.पारितोषिक वितरण कार्पोरेट कीर्तनकार समीर लिमये व स.भु.वाणिज्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.संजय गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रसन्नकुमार बोठे यांनी केले. यावेळी रवींद्र मुरूगकर,सचिन सृष्टीकर, गजेंद्र तारे,विजय मुळे, गौरव कुलकर्णी,शशिकांत कुलकर्णी,सचिन जोशी,अनिकेत चोबे, उमेश कुलकर्णी, इशान मक्तेदार, सायली पिल्ले,रुपेश बंगाळे आदींनी परिश्रम घेतले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.


या स्पर्धेत बाल गटात प्रथम- पद्मनाभ बोथे,द्वितीय-निशांत जोशी,तृतीय-सारंग जोशी, महाविद्यालयीन गट, प्रथम-गौरव वाघमारे,द्वितीय-कौस्तुभ घायाळ, तर खुल्या गटातील प्रथम पारितोषिक गणेश देशमुख,द्वितीय- सतीश पुरुषोत्तम अन्वेकर,तृतीय-अतुल बहिवाळ यांना ग्रंथ व प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली.

## खून प्रकरण : आरोपींना 5 दिवसांची पोलीस कोठडी


**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** सोशल मीडियावरील भाईगिरीच्या 'रील'चा वाद आणि वर्चस्ववादातून सिडको पोलीस ठाण्यापासून अवघ्या १०० फुटांवर तरुण प्रवीण सुरेश मांडोळे (वय १८, रा. संभाजी कॉलनी, एन-६) याचा चाकूने वार करून निर्घृण खून करण्यात आला होता. या खळबळजनक प्रकरणातील अटक करण्यात आलेल्या दोन मुख्य आरोपींना न्यायालयाने ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी पोलिसांनी प्रसन्नजीत हिवाळे आणि अरुण भुल या दोन मुख्य आरोपींना गजाआड केले आहे. मृत प्रवीण मांडोळे आणि आरोपी प्रसन्नजीत हिवाळे हे पूर्वी एकाच भागात राहत असल्याने त्यांच्यात चांगली मैत्री होती. मात्र, काही काळापूर्वी त्यांच्यामध्ये मुलीच्या कारणावरून वाद झाला होता. हे दोन्ही तरुण इन्स्टाग्राम वर भाईगिरी आणि टपोरीगिरीचे रील बनवून पोस्ट करत असत. या रीलच्या माध्यमातून एकमेकांना आव्हान देण्याच्या आणि सोशल मीडियावरील 'भाईगिरी'चे वर्चस्व सिद्ध करण्याच्या वादातून हा खुनाचा थरार घडला. ५ ते ६ जणांच्या टोळक्याने प्रवीणला गाठून बेदम मारहाण करत त्याचा काटा काढला.

**पोलीस ठाण्यासमोरच थरार :** विशेष म्हणजे, हा सगळा प्रकार सिडको पोलीस ठाण्यापासून अवघ्या १०० फुटांच्या अंतरावर घडला. यामुळे शहरातील गुन्हेगारांना पोलिसांचा धाक उरला आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.


# आंतरराष्ट्रीय सायकल दिवस विशेष : कर्णबधिर पण नियमित सायकलिंग छायाचित्रकार सचिनची 40 वर्षांपासून सायकल बनली सखी, विश्रांतीचीही यशस्वी वाटचाल

















### युद्धजन्य परिस्थितीत आरोग्य व बचतीला प्रोत्साहन

महागाई,युद्धजन्य परिस्थितीत सायकलचा वापर वाढला आहे . पण शहरात सायकल ट्रॅक्सची कमतरता भासत असून ते तयार केले तर जास्तीत जास्त नागरिक सायकलकडे वळतील . बहुसंख्य कामगार याच वाहनाचा वापर करतात . ध्वनी व वायू प्रदूषण यामुळे कमी होईल .वाहतूक कोंडी कमी होण्यासाठी साइकिल ट्रॅक होणे फार गरजेचे आहे -

डॉ. विजय व्यवहारे
अध्यक्ष
सायकलिस्ट फाऊंडेशन

**छत्रपती संभाजीनगर :** कर्णबधिर असूनही प्रसिध्द छायाचित्रकार असा ठसा उमटवून दीव्यागत्वाचे व्यंग दूर सारून दररोज सायकलिंग करणारे सचिन शरद गोडसे अनेकांकडून दाद मिळवितात.

लहानपणापासून म्हणजे १९७८ पासून सायकल त्यांची सखी बनली. इयत्ता सातवीत असताना हे माझे आवडते वाहन चालवणे शिकलो.तेव्हा सायकल चालवताना रेल्वेस्टेशनरोड ते खडकेश्वरपर्यंत बालज्ञान मंदिर शाळेत जात असे. नंतर आठवी ते दहावीपर्यंत सरस्वती भुवन प्रशाला येथे सायकलवरून जात असे. १९८६ ते शासकीय महाविद्याल -१९८६ १९८८ अशी महाविद्यालयीन शैक्षणिक प्रवासही सायकलसखीच्या स्वारीनेच पूर्ण केला.सचिन हे हौशी सायकलपटू. २९ जून २०२४ पासून सायकल ते सायकलिस्ट फाऊंडेशन ग्रुप बरोबर सायकल राईड करतात. यात ४० पेक्षा जास्त सदस्य

एकत्र ग्रुप राईड करत आहेत. ज्येष्ठ सायकलिस्ट जयंत सांगविकर यांना ते आपला आदर्श मानतात.मुळे डॉ.विजय व्यवहारे , डॉ .प्रशांत महाले डॉ .अरुण गावंडे आदींशी परिचय झाल्यावर त्यांची सायकलिंग आणखीच जोमात होत गेली.

पायांना व्यायाम , उत्तम फिटनेस राखत 5 किमी , 10 किमी , 20 किमी ते 30 किमी , 65 किमी , सायकल चालवण्याचा अनुभव घेतला आहे , आतापर्यंत 10 पदके व प्रशस्तिपत्र मिळाली आहेत असेही त्यांनी सांगितले.

**विश्रांतीची भरारी,आता सुपर रॅन्डोनर्स हेच लक्ष्य :**

छत्रपती संभाजीनगर येथील विश्रांती गायकवाड या दररोज नियमितपणे सायकलिंग करतात.

मात्र अनेक वेळा रस्त्यावर बस, ट्रक किंवा इतर वाहने मोठ्याने हॉर्न वाजवत अगदी जवळून जातात, त्यामुळे त्रास होतो आणि असुरक्षित वाटते. महिलांसाठी सायकलिंग करताना सुरक्षित वातावरण असणे खूप महत्त्वाचे आहे. असे त्यांचे मत आहे.प्रत्येक वाहनचालकाने सायकलस्वारांचा आदर करून सुरक्षित अंतर ठेवावे, जेणेकरून महिला सायकलिस्ट निर्धास्तपणे आणि सुरक्षितपणे सायकलिंग करू शकतील. असेही त्यांनी सांगितले.

**सूनबाई- सासरे सायकलिंगमधील विशेष :**

अभियंता सासरे व इंजिनिअर सूनबाई हे सायकलिंगमधील विशेषपणच आहे.पांडुरंग लहाने हे देवगिरी सायकलिंग क्लबचे अध्यक्ष एस आर) अध्यक्ष देवगिरी सायकलिंग क्लब

आरोग्याला लाभ व्हावा म्हणून सुरू केलेली लहाने मामा यांची सायकलिंग सूनबाई अश्विनी संकेत लहाने यांच्यासाठी प्रेरणा ठरली.

दोघेही दररोज दररोज ३० ते ५० किलोमीटर सायकलिंग करतात. २०२१ पासून आजपर्यंत लहाने यांनी तब्बल ८८००० किमी सायकलिंग केली आहे. मानाचा एसआर किताब तीन वेळेस पटकावला आहे. चार वर्षापासून पंढरपूर ,नवरात्रात तुळजापूर व शिर्डी सायकलवार गाठलेली आहे.

**अश्विनीने पूर्ण केली डेक्कन क्लिफर हॅंगर :**

अश्विनी लहाने यांनी आता पर्यंत २६ हजार किमी)सायकलिंग पूर्ण केली आहे समाजाला सामाजिक संदेश देत त्या दररोज अनेक तास साइकलिंग करतात. एसआर किताब व नामांकित टेक्कन क्लिफ हॅंगर ही पुणे ते गोवा स्पर्धा त्यांनी पूर्ण केली आहे.

**अधिकारी गंधम यांचीही कमाल :**

भूमी अभिलेख कार्यालयातील गणेश गंधम हे 2016 पासून सायकलिंग करतात. याचा कोरोणा काळात खुपच लाभ झाला दररोज सरासरी 20 किलोमिटर सायकलिंग करतो. छत्रपती संभाजीनगर सायकलिंग असोसीएशनचे अध्यक्ष निखील कचेश्वर , सचिव चरणजितसिंग संघा , कार्यकारी सदस्य मनीष खंडेलवाल तसेच तेजस्विनी सायकलिंगच्या अध्यक्षा निता गंगावणे यांचे मार्गदर्शन मिळाले असून आतापर्यंत 200, 300 व 400 किलोमिटर बीआर एमचा पल्ला गंधम यांनी पूर्ण केलेला आहे . आईच्या आजारपणामुळे 600 किलोमिटर करता आले नाही.परंतु भविष्यामध्ये मी एस आर टायटल पुर्ण करणार आहे.

आजच्या अत्यंत धकाधकीच्या जिवनामध्ये आरोग्य चांगले ठेवण्यासाठी प्रत्येक वयागटातील महिला पुरुष सदस्यानी दररोज सांकलिंग करणे आवश्यक आहे.असे त्यांनी सांगितले.


मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911